

# चकवा

## आस्वाद आणि समीक्षा

प्रा.डॉ. माधव कदम

अथर्व पब्लिकेशन्स्

चकवा : आस्वाद आणि समीक्षा

प्रकाशन क्रमांक : ५०९

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-00-9

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स्**

**धुळे** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१.

**संपर्क** ९४०५२०६२३०

**जळगाव** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव - ४२५००१.

**संपर्क** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

**ई-मेल** atharvapublications@gmail.com

**वेबसाईट** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती**

३० ऑगस्ट, २०१७

**मुखपृष्ठ**

विशाल लोहार

**अक्षरजुळवणी**

अथर्व पब्लिकेशन्स्

**मूल्य**

१५०/-

online पुस्तक खरेदीसाठी
**www.atharvapublications.com**

---

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

सस्नेह भेट...

# चकवा

## आस्वाद आणि समीक्षा


**प्रा. डॉ. माधव कदम**

(पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग)

ग. तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार



**अथर्व पब्लिकेशन्स्**

# १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना



Prashant

डॉ. माणिक माधव बागले

# १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना

1975 Nantarche Marathi Natak : Aashay Aani Rachana

© सुरक्षित

**प्रकाशक व मुद्रक**

रंगराव पाटील । प्रशांत पब्लिकेशन्स: ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव ४२५००१.

**दूरध्वनी:** ०२५७-२२३५५२०,२२३२८०० **ईमेल:** prashantpublication.jal@gmail.com

**प्रथम आवृत्ती:** डिसेंबर २०१७ **आयएसबीएन:** ९७८-९३-८५०१९-००-५

**मुखपृष्ठ:** स्वप्नील फलटणकर **अक्षरजुळवणी:** प्रशांत पब्लिकेशन्स **मूल्य:** ₹ ४५०

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

www.prashantpublications.com

# अनुक्रमणिका


१. 'तनमाजोरी' : आंबेडकरी विचारांचा समृद्ध अविष्कार ........................ १
– प्रा. डॉ. संजय कांबळे
२. १९७५ नंतरच्या दलितेतर नाटकांतील जात–वास्तव : एक दृष्टिक्षेप ............... ८
– डॉ. ताहेर एच. पठाण
३. दोन अंकी सामाजिक नाटक – 'जाता नाही जात' : संहिता वाचन ...............१३
– प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन
४. 'आई रिटायर होतेय!' : नाटकातील संघर्षाचे स्वरूप ...............................२१
– प्रा. डॉ. अण्णा वैद्य
५. १९७५ नंतरचे मराठी स्त्रीवादी नाटक ...................................................२७
– प्राचार्य डॉ. संजय शालकराव शिंदे
६. १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास ..................३४
पुरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ
– डॉ. बाबा हरी पाटील, डॉ. मनोहर झगडू सुरवाडे
७. आंबेडकरी नाट्यसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास ..............................४३
– डॉ. कमलाकर पायस
८. 'वाडा चिरेबंदी' – त्रिनाट्यधारा : एक अवलोकन ...................................४९
– डॉ. बाळासाहेब रंगनाथराव दहिफळे
९. १९७५ नंतरचे मराठी समस्याप्रधान नाटक...........................................५४
– प्रा. डॉ. दीपक रामभाऊ चिद्दरवार
१०. १९७५ नंतरचे मराठी आंबेडकरी नाटक आणि रंगभूमी..........................६२
– प्रा. संजय नामदेवराव आठवले
११. १९७५ नंतरचे मराठी आंबेडकरी नाटक –
'यातना उत्सव' : आशय आणि रचना ..................................................६८
– प्रा. अर्चना रामचंद्र चव्हाण
१२. रा. रं. बोराडे यांच्या नाटकातून व्यक्त झालेला जातीय संघर्ष.........................७२
– प्रा. डॉ. ताराचंद निमिचंद बिंदवाल
१३. इ. स. १९७५ नंतरचे प्रमुख मराठी नाटककार व नाटक.............................७७
– प्रा. सौ. चारुता पद्मनाभ गोखले
१४. प्रा. दत्ता भगत यांच्या नाटकातील प्रमुख पात्रचित्रण.................................८४
– प्रा. डॉ. वासुदेव सोमाजी वले
१५. 'ठष्ट'मधील पात्र चित्रण................................................................९०
– प्रा. डॉ. सुधा मधुकर खराटे
१६. श्री. ना. पेंडसे यांच्या नाटकातील आशय आणि रचनेतील वेगळेपण .............९७
– प्रा. डॉ. माधव कौतिक कदम

# श्री.ना.पेंडसे यांच्या नाटकातील आशय आणि रचनेतील वेगळेपण

प्रा. डॉ. माधव कौतिक कदम

पदव्युत्तर मराठी विभाग, जी.टी.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध प्रवृत्ती आणि प्रवाहांची समृध्द परंपरा मराठी नाटय वाङ्मयात निर्माण झाली. विषय, आशय आणि अभिव्यक्ती या साऱ्याच बाबतीत नाटयवाङ्मय यात आमुलाग्र बदल झाला. आशय आणि रचनेच्या दृष्टीने काही नाटककारांनी नाटय वाङ्मयात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. या अस्तित्वात श्री. ना. पेंडसे या प्रादेशिक कादंबरीकाराने नाटककार म्हणुनही आपले स्थान नाटय क्षेत्रात निर्माण केले. स्वत:च्याच कांदबऱ्यावर त्याचं नावाने नाटके लिहुन कलांतर अथवा प्रकारांतर सारखा रचनाप्रकार हाताळुन नाटके लिहीली. तर काही नाटकांची निर्मती ही रुपांतरीत, काहींची दुसऱ्या नाटकावरुन सुचल्याची तर काही नाटकाची स्वतंत्र मांडणी केली आहे. म्हणुनच १९७५ नंतरच्या नाटयप्रवाहात त्यांची फारशी नाटके नसली तरी रचनापध्दतीत त्यांनी केलेला बदल आणि नाटकाचे आशय सुत्र म्हणून या नाटकांकडे पाहता येते. यासाठीच मी माझ्या संशोधन पेपरसाठी त्यांच्या नाटकांची निवड केली.

१९५० नंतर मराठी कादंबरीत प्रादेशिक कादंबरी हा प्रवाह समृध्द करणाऱ्या श्री. ना. पेंडसे यांनी आपल्याच प्रादेशिक कादंबाऱ्यांवर त्याच शिर्षकाची नाटके रचलीत. प्रकारांतर सारखा प्रकार हाताळुन त्यांनी आपल्याच कादंबऱ्यावर काही नाटके लिहीलीत. पण काही नाटके ही अनुवादीत तर काही स्वतंत्र प्रतिभेची निर्माण झाली आहेत. यात महापुर, राजे मास्तर, यशोदा, गारंबीचा बापू, संभुसाच्या चाळीत, असं झालं आणि उजाडलं, पंडीत! आता तरी शहाणे व्हा, चक्रव्युह, आक्टोपस, शोनार बंगला, रथचक्र, डॉ. हुद्दार अशी जवळ पास १२ नाटके लिहीली आहेत. यातील 'आक्टोपस' आणि 'शोनार बंगला' ही अप्रकाशीत आहेत तर 'महापूर', 'पंडीत! आता तरी शहाणे व्हा', 'संभुसाच्या चाळीत' ही तीन नाटके स्वतंत्ररित्या लिहीली आहेत. या नाटकातील संशोधन पेपरच्या कालखंडानुसार १९७५ नंतरच्या नाटकांमध्ये 'पंडीत! आता तरी शहाणे व्हा' (१९७८), 'रथचक्र' (१९८०) व 'डॉ. हुद्दार' (१९९०) या तीनच नाटकांचा समावेश होत असुन आशय सुत्राच्या अंगाने त्यांची मांडणी करता येईल.

'पंडीत! आता तरी शहाणे व्हा' हे १९७८ मध्ये मौज प्रकाशनाने प्रकाशीत

केलेले १०६ पृष्ठांचे छोटेखानी नाटक प्रवेश पध्दतीने लिहीलेले आहे. ३ अंकी नाटक पेंडशांना आपली स्वतंत्र प्रतिभा सिध्द करण्यासाठी उपयोगी ठरले. तर पुढील दोन्ही नाटके म्हणजे 'रथचक्र' हे मौज प्रकाशनाने १९८० मध्ये प्रकाशीत केलेली नाटक पेंडश्यांनी आपल्याच 'रथचक्र' या गाजलेल्या कादंबरीचे प्रकारांतर केले आहे. तर 'डॉ. हुद्दार' सारखे १९९० मध्ये लिहीलेले नाटक हे प्रसिध्द तत्वज्ञ जाँ पॉल सार्त्र यांच्या 'डर्टी हॅंड्स' या नाटकाचे रुपांतर केले आहे. म्हणजेच संशोधन पेपरसाठी श्री. ना. पेंडसे यांची निवडलेली ३ ही नाटके ही आशयदृष्ट्या आणि रचनादृष्ट्याही भिन्न-भिन्न प्रवृत्ती आणि प्रवाहांची मांडणी करणारे आहेत. रुपांतर, प्रकारांतर सारखा प्रकार यशस्वीपणे हाताळुन त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रतिभेचे ही दर्शन आपल्या नाटकातुन घडविले आहे.

'पंडीत! आता तरी शहाणे व्हा' हे डिसेंबर १९७८ मध्ये मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेले नाटक. पंडीत, काका, वहिणी, जीनी, जगन, बंडा बंदरकर, शिवा बंदरकर, मालवणकर अशी मोजकी ८ पात्रे. या नाटकात वयाची साठी गाठलेले आणि आयुष्याची गोळाबेरीज करणारे पंडीत हे या नाटकाचे प्रमुख पात्र, नवा फ्लॅट घेतला तर तो आपल्याला परवडेल का? त्यापेक्षा जुन्याच जागेवर आयुष्य काढावे अश्या विचारसरणीच्या पंडीत यांच्या आयुष्यात सौ. पंडीत मात्र घरची परिस्थिती चांगली असतांनाही केवल त्यांच्या कलागुणांना भाळुन प्रेमविवाह करतात. त्यांना जीनी आणि जगन ही दोन मुल होतात. या दोघांनी खुप शिकावं, स्वकर्तुत्वाने दोघांनी स्वतःचे समाजात स्थान निर्माण करावं अशी मध्यमवर्गीय अपेक्षा पंडीत व सौ. पंडीत या दामत्यांना वाटतं. पण जीनी वैधकशास्त्रात एम.डी. ची पदवी घेऊन डॉक्टर होते. स्वतंत्र विचारांची असल्याने झोपडपट्टीत जाऊन मोफत सामाजिक सेवा सुरु करते. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थेशी जुडते. तिथल्या लोकांच्या गळयातली ताईत बनते. अख्खं आयुष्य समाजसेवेत समर्पित करते म्हणुन सुखवस्तु घरांच मागणं आल्यावर ती नाकारते. श्रीमंतीपेक्षा स्वातंत्र्याला ती महत्व देऊन चळवळीतल्या आपल्या सहकारी बंडा बंदरकार याच्याशी विवाह करण्याचे ठरविते पण परंपरावादी पंडीत त्याला नकार देतात. जी जीनीची गोष्ट तीच जगनची गोष्ट. जगनही पी.एच.डी. होतो. संशोधन क्षेत्रात अमेरिकेत त्याला मान्यता मिळते. झोपडपट्टी सुधारणेसंबंधी नवी कल्पना मांडुन बंडा आणि शिवा बंदरकरच्या सहाय्याने तो पुर्ण करण्यासाठी झोपडपट्टीत आपले काम सुरु करतो. तेथील लोकांच्या सहकार्याने 'पेलो संघ' स्थापुन समाजहिताच्या कार्यात समर्पित होतो. दोघंही भावंड वैयक्तिक सुखाकडे पाठ फिरवतात म्हणुन पिता पंडीत मात्र आतुन जळत असतात. आपली मुलं भटकत जात आहेत, आपण त्यांच्याविषयी

पाहिलेली स्वप्ने उध्वस्त होत आहेत असे त्यांना वाटते. शेवटी त्यांच्या मित्र रेडकर (काका) त्यांना समजवतात. मुलं वाहयात न बनता प्रतिष्ठीत बनल्याचं झोपडपट्टीवासियांनी काढलेल्या मिरवणुकीव्दारे पटवुन देतात आणि 'पंडीत! आता तरी शहाणे व्हा...' असे सुचवितात. मध्यमवर्गीय कुटूंबात मुलांच्या भविष्याची नको ती चिंता करणारे आई-वडिल मुलांना भविष्य असतांना त्यांनी भरकटू नये ही भिंती तर दुसरीकडे उच्चशिक्षित तरुणांनी नवी मुल्ले स्विकारणे कसे गरजेचे आहे हे आशयसुत्र नाटकातुन डोकावते.

'रथचक्र' हे १९८० मध्ये मौजे प्रकाशनाने प्रकाशित केलेले श्री.ना. पेंडसे यांचे एकत्र कुटूंबातील समस्येला वाचा फोडणारे महत्त्वाचे नाटक. चार भावाच्या एकत्र कुटूंबातील वृत्तीप्रवृत्तींच्या शोध पेंडसे या नाटकात घेतात. पतीच्या अस्तीत्वाशिवाय एकत्र कुटूंबातील स्त्रीला अस्तीत्व नाही. तिच्या वाटयाला कसे अपमानाचे जीणं येते हेही या नाटकातुन मुख्य पात्र 'ती'च्या माध्यमातुन पेंडसे मांडतात. ती ही 'रथचक्र' नाटकाची नायिका. 'ती' ला नाव नाही. एकाकी स्त्रीचे सारे दु:ख 'ती'च्या रुपाने पेंडसे उभे करतात. कारण 'ती'चा नवरा, गुंडया आणि पुंडया ही दोन मुल झाल्यावर अर्धवट संसार सोडुन संन्याशी म्हणुन निघुन जातो. नवरा अर्धावर संसार सोडुन गेल्यावर मुलांच्या सांभाळ करण्याची जवाबदारी ती वर येऊन पडते. पण एकत्र कुटूंब पध्दतीत घरात पती असला तर त्या स्त्रीला कुटूंबात मानाचे स्थान असते. अन्यथा विधवा स्त्रीया किंवा नवऱ्याने टाकलेल्या स्त्रीया घरात राबण्यापुरत्याच असतात हा अनुभव तीच्या वाटयालाही येतो. अशा ही परिस्थितीत ती संघर्षातुन मुलांना शिकविते, तालुक्याच्या गावी मुलांना घेऊन हिंमतीने एकटी राहते. त्यांच्यासाठी मोलमजुरी करते. परिस्थितीला धैर्याने तोंड देते पण शिक्षणाने मुलांच्या परिस्थितीत फरक पडेल या तिचा आशा फोल ठरतात. कारण गुंडया खानावळवाल्या कृष्णाबाईसोबत पळुन जातो तर पुंडयाचं लग्न एकत्र कुटूंबात घरावर असलेल्या कर्जापोटी सावकाराच्या लंगडया आणि तिरळया मुलीशी करायचे ठरवतात. हे तिला असहय झाल्याने या लग्नाला ती विरोध करते. तिचा हा अडथळा दुर करण्यासाठी घरचे तिला एका खोलीत डांबुन ठेवतात. पुंडयाला हे कळलं तेव्हा तो आईला भैटायला जातो. परंतु ती गळफास घेऊन मेलेली असते. हे पाहुन पुंडया तुझ्या पायाची शपथ घेऊन सांगतो हे लग्न मी करणार नाही.[१] (अंक ३ रा पृष्ठ ९६) आई आणि मुलाच्या मनाची घालमेल त्यातुन लक्षात येते.

नाटकात 'ती'च्या रुपाने स्त्रीधर्माची, पतीव्रतेची आणि एका आईची शोकांतीका व्यक्त झाली आहे. ती परिस्थितीचा बळी ठरली आहे. पतीचा बेजवाबदारपणा, मुलांचा प्रतिसाद नाही आणि घरच्यांची वागणुक यामुळे तिची पडझड होते.

अशाही परिस्थितीत परंपरागत स्त्रीपेक्षा 'ती'चे वेगळपण खुलुन दिसते. म्हणुन डॉ. मधुरा कोरान्ने म्हणतात, ''पती सन्याशी होवुन निघुन गेल्यामुळे ती मातृत्व या जबाबदारीला महत्व देवुन ताठ मानेने जगण्याची धडपड करते. आपल्या मुलांनी शिकावे म्हणुन आटोकात प्रयत्न करते, परंतु मुलांना तिची तळमळ जाणवत नाही. शेवटी आत्महत्येशिवाय तिच्यापुढे पर्याय उरत नाही आणि तोच मार्ग ती स्विकारते.''[२]

'डॉ. हुद्दार' हे १९७५ नंतरच्या कालखंडातील श्री. ना. पेंडसे यांनी लिहीलेले १९९० चे नाटक प्रसिध्द तत्त्वज्ञ जाँ. पॉल सार्त्र यांच्या 'डर्टी हँड्स' या नाटकाचे 'डॉ. हुद्दार' या नावाने रुपांतर केले आहे. साम्यवादयांच्या राजकारणाचे दर्शन, मानवी महत्वाकांक्षेचे वेगवेगळे पदर आणि महत्वाकांक्षेच्या संघर्षात चिरडल्या जाणाऱ्या मुल्यांची शोकांतिका या नाटकातुन व्यक्त झाली आहे. नाटकात डॉ. हुद्दार आणि कर्नल या प्रमुख व्यक्तीरेखा. दोघंही एकाच नाण्याच्या दोन बाजु. डॉ. हुद्दार प्रचंड हुशार, विव्दत्ता आणि दुरदृष्टी असलेले तर कर्नल कर्तव्य पुर्तीसाठी भावनांची हत्या करणारे, कुशाग्र, विद्ववान नेता. या दोघांच्या संघर्षात चंदन आणि अजिता सारखी मानसं भरडली जातात. तर बंडो आणि खंडोसारखी डोक्याचा अजिबात वापर न करणारी आज्ञाधारक मंडळीही या नाटकाच्या कथानकाला चालना देतात. थोडक्यात जाँ. पॉल सार्त्र यांनी १९४० मध्ये लिहीलेले नाटक आणि श्री. ना. पेंडसे यांनी १९९० मध्ये लिहीलेल्या या नाटकात आलेला राजकीय परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. परिस्थिती बदलली तरी बदलाची प्रक्रिया तीच आहे. तोच गोंधळ, तोच घोटाळा, तेच संदर्भ व तोच संघर्ष या मुळाशी आहे. हे नाटकातुन व्यक्त होते. स्वत: नाटककार प्रस्तावणेत लिहितात, ''मुळ नाटकात व त्यांच्या नाटकात कालाचे एवढे अंतर असले तरी सुर्देवाने जी राजकीय परिस्थिती सदर प्रसंगाला कारणीभुत होती. तीत काहीही फरक पडलेला नाही.''[३]

अशा रितीने श्री. ना. पेंडसे यांनी आपल्याच कादंबरीवरुन कलांतर सारखा नवा प्रकार हाताळुन १९६० च्या दशकापासुन नाटय लेखनाला सुरुवात केली. त्यांची एखाद दोन कलाकृती स्वतंत्र पध्दतीची सोडली तर नाटयवृत्ती हया रुपांतरीत अथवा कलांतरीत/प्रकारांतरीत आहेत. म्हणुन स्वाती कर्वे लिहीतात, ''शिवाय पेंडसे मुळात कादंबरीकार. आपल्या कादंबऱ्यांच्या आधारे ते नाटय लेखन करीत आहेत. असे असल्यामुळे नाटककार म्हणुन त्यांचा विचार करायचा का? हा प्रश्नच आहे.''[४] याचा अर्थ नाटयरुपांतर करणाऱ्या लेखकांकडे कोणत्या दृष्टीने पाहतांत ते लक्षात येते. पण खुद्द पेंडसेंचे मत कल्पना कामत नमुद करताना लिहीतात, ''कादंबरीचे नाटक करणे हे स्वतंत्र नाटक लिहीण्यापेक्षा अधिक अवघड.

कादंबरीतले प्रसंग कितीही उत्कृष्ट असले तरी ते गंभीर नसतील तर नाटकाला निरुपयोगी.''[५] पेंडसे कलांतर प्रकार हाताळणारे असो की स्वतंत्र नाटय लेखक असो; त्यांनी १९६० च्या दशकापासुन जी नाटके लिहीलीत ती नाटय वाङ्मयात मोलाची भर टाकणारे होते.

**निष्कर्ष**

» 'पंडीत! आता तरी शहाणे व्हा...' नाटकातुन प्रस्थापित मुल्ये विरुध्द नवे जीवन मुल्ये यातील सुप्त संघर्ष व्यक्त होतो.

» 'ती'च्या माध्यमातुन भारतीय कुटूंब संस्थेची समस्या मांडली आहे.

» 'डॉ. हुद्दार' नाटकातुन वैचारिक व्द्ंव्दात आणि महत्वाकांक्षेत निरपराध व्यक्तीचा बळी जाणे हेच मुख्य सुत्र लक्षात येते.

» कादंबरीचे नाटक करणे हे स्वतंत्र नाटक लिहिण्यापेक्षा अधिक अवघड असते अशी पेंडसे यांची भुमिका असल्याचे लक्षात येते.

**संदर्भ**


१) रथचक्र, श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८०

२) मासिक नवभारत, संपादक मे. पु. रेगे., एप्रिल ते जुन अंक ७, ८, ९ वर्षे ४६, १९९३ पृष्ठ ९३ वरील आधुनिक मराठी नाटकातील स्त्री समस्या हा डॉ. मधुरा कोरान्ने यांचा लेख.

३) नाटकाची सावली, सुरेशचंद्र पाध्ये, विमल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९१, पृष्ठ १८४.

४) दळवींची नाटके एक अंतर्वेध, प्रा. स्वाती कर्वे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, जाने १९९३, पृष्ठ १९५.

५) मराठी कादंबऱ्याची नाट्यरुपांतरणे, कल्पना कामत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९८, पृष्ठ २५८.

६) पंडीत! आता तरी शहाणे व्हा, श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९७८.

७) डॉ. हुद्दार, (जाँ. पॉल सार्त्र यांच्या 'डर्टी हॅडस' नाटकाचे रुपांतर), मौज प्रकाशन, मुंबई, १९९०.

North Maharashtra University

T.Y.B.Sc. | SEM-VI | CH-362

# CHEMISTRY

Prashant



# INORGANIC CHEMISTRY

Prof N E Barhate | Dr M R Patil | Dr R G Mahale

CHEMISTRY

Prashant

**CH - 362**
**Inorganic Chemistry**

© Authors

**Publisher and Printer**
**Prashant Publications**
*3, Pratap Nagar, Shri Sant Dnyaneshwar Mandir Road,*
*Near Nutan Maratha College, Jalgaon 425001.*
☎ *(0257) 2235520, 2232800*
*Website : www.prashantpublications.com*
*E-mail : prashantpublication.jal@gmail.com*

**First Edition :** *Dec. 2017*

**ISBN :** 978-93-85019-04-3

**Type Setting**
*Prashant Publication*

**Price :** ₹ 55/-

*All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (xerox copy), recording or otherwise, without the prior permission.*

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महाराष्ट्रीयन क्रांतिकारकांचे योगदान




डॉ. ए. जी. जयस्वाल
प्रा. एच. बी. सरतापे
प्रा. एन. ओ. पाटील
प्रा. आर. के. तुपे


अथर्व

अथर्व पब्लिकेशन्स

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये
महाराष्ट्रीयन क्रांतिकारकांचे योगदान

© सुरक्षित

ISBN 13 : 978-93-87129-14-6

प्रकाशक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स्

धुळे १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे - ४२४००१.

संपर्क ९४०५२०६२३०

जळगाव तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव - ४२५००१.

संपर्क ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल atharvapublications@gmail.com

वेबसाईट www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती
१५ जुलै २०१७

अक्षरजुळवणी
अथर्व पब्लिकेशन्स

मूल्य
₹ २५०

सदर पुस्तकात आदिवासी सेवा सहायक आणि शिक्षण प्रसारक संस्थेचे श्री. डी. एच. अग्रवाल कला, श्री. रंग अवधूत वाणिज्य आणि श्री. सी. सी. शाह आणि एम. जी. अग्रवाल विज्ञान महाविद्यालय, नवापूर, जि. नंदुरबार येथे दि. १५ जुलै २०१७ रोजी आयोजित केलेल्या 'सीएमआरआयआयएम' या राष्ट्रीय चर्चासत्रातील लेखांचे संकलन करण्यात आले आहे.

सदरील पुस्तकातील प्रसिद्ध झालेल्या लेखांची मते हि त्या त्या लेखकांची आहेत. त्याच्याशी मुख्य संपादक, संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

१२) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतीवीर ........................ ७६
वासुदेव बळवंत फडके यांचे योगदान
– डॉ. एच. आर. चौधरी
– प्रा. एच. बी. सरतापे
१३) वीर क्रांतिकारक तंट्या भिल ऐतिहासीक विश्लेषण ......... ८०
– प्रा. निशांत भिमरावजी शेंडे
१४) खान्देशातील आदिवासी वीर पुरूष गुलब्या नाईक .......... ८४
– प्रा. संतोष मारूती साठे
१५) महाराष्ट्रातील क्रांतीकारक चळवळ आणि ................... ८८
वासुदेव बळवंत फडके
– प्रा. जी. एन. पाटील
१६) सातारा जिल्ह्यातील आझाद हिंद सेनेतील स्वातंत्र्यसेनानी ... ९३
– प्रा. कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय
१७) १९ व्या शतकातील खानदेशातील आदिवासींचे उठाव...... ९८
– प्रा. ए. एस. देसले
१८) भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे .. १०४
योगदान – स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर
– प्रा. अनिल प्रभाकर निकम
१९) भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात महाराष्ट्रीय क्रांतिकारकांचे..... १०७
योगदान, स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतिकारकांचे योगदान
– प्रा. जयश्री रा. साळुंके

# वीर क्रांतिकारक तंट्या भिल ऐतिहासीक विश्लेषण

प्रा. निशांत भिमरावजी शेंडे
पदव्युत्तर इतिहास विभाग, जी. टी. पाटील महाविद्यालय,
नंदुरबार, जि. नंदुरबार (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास हा एक 'मैलाचा' दगड ठरला. भारताला ब्रिटीशांच्या वसाहतवाद, साम्राज्यवाद, पराकोटीचे आर्थिक शोषण, सांस्कृतिक दिवाळखोरी यासारख्या गूलामगिरी व शोषणापासून मिळालेले स्वातंत्र्य हे अनेक राजकिय हुतात्माच्या, नेत्यांच्या व क्रान्तीकारकांच्या त्याग, समर्पण व प्राणाहूतीला आलेले दृश्य फळ आहे. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात क्रांतीकारकांच्या क्रांतीकार्याला असाधारण महत्व आहे. भारतातील ब्रिटीश सत्तेच्या उदय व दृढीकरणाच्या काळात ब्रिटीश सत्तेसमोर आपल्या कर्तृत्वाने व अचाट अशा पराक्रमाने ज्या वर्गाने जबर अशा स्वरुपाचे आव्हान निर्माण केले होते, तो वर्ग म्हणजे क्रांतीकारकांचा वर्ग होय. या क्रांतीकारकांच्या मालिकेमध्ये सातपुड्याच्या पर्वतरांगात, दऱ्या-खोऱ्यात, जगंलामध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातीच्या क्रांतीकारकांनी ब्रिटीश सत्तेच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक शोषण व गूलामगिरीच्या विरोधात आपल्या पारंपारिक शस्त्रानिशी सशस्त्र बंडाचा झेंडा प्रथमतः उभारला व पर्यायाने ब्रिटीशांच्या पारतंत्र्याच्याविरुद्ध स्वातंत्र्याची पहिली तूतारी त्यांनी फूंकली. याच आदिवासी क्रांतीकारकांच्या पराक्रमाच्या इतिहासातील एक वादळी व कर्तबगार व्यक्तिमत्व म्हणजे 'तंट्या भिल' होय.

प्रारंभिच्या इतिहासलेखन परंपरेत अभिजनवादी इतिहासकारांच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोणाच्या चष्मातून भारताच्या स्वातंत्र्यसग्रामांतील तंट्या भिलसारख्या आदिवासी नरवीर, जननायक, क्रांतीकारकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. त्यांच्या कार्याला पारंपारिक इतिहासलेखनात स्थान मिळाले नाही, परंतू काळाच्या ओघात

इतिहासलेखनात 'Sabultarn Studies' यासारख्या वंचिताचे इतिहासलेखन हा प्रवाह उदयास आला, व पर्यायाने या कालावधीपर्यंत दूर्लक्षित असलेले आदिवासी क्रांतीकारकांचे क्रांतीकार्य लेखनाच्या माध्यमातून समाजासमोर येवू लागले. व अशा लेखनप्रक्रियेत अद्वितीय स्थान मिळालेले क्रांतीकारक व्यक्तिमत्त्व म्हणजे 'तंट्या भिल' होय. तंट्या जातीव्यवस्थेचा गुन्हेगार होता. पण माणुसधर्माचा तो एक आदर्श पुरुष होता.

मध्यभारतातील सातपूड्याच्या पूर्व-पश्चिम पर्वत रांगेच्या उत्तरेकडील पर्वत रांग राजपिपला या नावाने ओळखली जाते. जी महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या सिमेवर असलेल्या पालच्या उत्तरेला आहे. या पर्वतराजीत सुक्ता नदीचे खोरे असून या खोऱ्यातील एक छोटे गाव बिरडा. या गावी इ.स.१८४२ मध्ये एका आदिवासी भिल्ल कुटूंबात तंट्याचा जन्म झाला.०१ बिरडा हे गाव मध्य प्रांतांतील निमाड जिल्ह्यातील एक सामान्य खेडे होते. त्याच्या वडिलांचे नाव भाऊसिंग लहान वयातच आई चे ममत्व हरपले. तंट्या लहानवयातच भालाफेकणे, धनूष्यबाण चालवणे या गोष्टी शिकत होता.०२ सुरूवातीच्या कालखंडात तंट्या हा हाडामासाने पक्का शेतकरी होता. त्याचे काळ्या मातिशी मोठ्या प्रमाणात ऋणानूबंध जुळले होते. म्हणूनच तो वयाच्या निम्म्यावर्यापर्यंत शेती करत होता. त्याची ही शेतजमिन तंट्याला आपल्या प्राणापेक्षाही प्रिय होती.

**तंट्या भिलच्या मनात क्रांतीच्या विचाराची ठिणगी**

जोपर्यंत तंट्याच्या व्यक्तीगत आयुष्यात व त्याच्या स्वतंत्र जिवनपद्धतीत कोणिही ढवळाढवळ केली नाही, तो पर्यंत तंट्या क्रांतीच्या वणव्यापासून कोसो दूर होता. परंतू जेव्हा त्याची आपल्या 'प्राणापेक्षा प्रिय' अशी जमिन संरजामशाहीने बळकविण्याचा खटाटोप सुरु केल्यावर प्रथमत : त्याच्या मनात अन्याय, अत्याचार, शोषणाच्या विरोधात संघर्ष करण्याच्या विचाराची ठिणगी पडली. परिणामत: प्रथमत: त्याने सरंजामशाही मोडीत काढण्यावरच भर दिला. प्रथम लढा त्याने 'शिवा पटेल' या सरंजामदाराविरुद्ध दिला.०३ परंतू शिवा पटेलने त्याच्या या कृत्याला गुन्हेगार ठरवून पोलिसांच्या ताब्यात दिले. यात त्याला एक वर्षाचा सश्रम कारावास झाला.

बालपणापासूनच पराकोटीचे आर्थिक शोषण व सामाजिक, धार्मिक गूलामगिरी वाट्याला आलेल्या तंट्याच्या मनात प्रस्थापित व्यवस्थेच्याविरोधात व ब्रिटीश सत्तेविषयी प्रचंड तिटकारा निर्माण झाला. परिणामत: ही प्रस्थापित व्यवस्था व ब्रिटीश सत्ता मुळापासून नष्ट करुन एक सार्वभोम सत्ता निर्माण करण्याचा त्याने आपल्या मनाशी ठाम निर्धार केला. शिवा पटेल याने तंट्यांची वडीलोपार्जीत जमिन हडप करुन त्याची खोटी तक्रार पोलिसात देऊन, तुरुंगवास

भोगायला लागला. ही घटना तंट्याला क्रांतीकारी विचाराकडे नेण्यास कारणीभूत ठरली.

### ब्रिटीश सत्तेच्या विरोधात तंट्या भिलचे क्रांतीचे बिगूल

हिंमत पाटलाने तंट्यावर खोट्या आरोपाचे दोषारोपन करुन खोट्या साक्ष दिल्या व तिनवेळा त्याला तूरुंगवास भोगायला लावला. याच दरम्यान हिरापूर जवळील बारी या गावी चोरी झाली. या खोट्या चोरीच्या गुन्ह्यात तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा तंट्यालाभोगावीलागली. शिक्षा भोगून झाल्यावर ब्रिटीश राजवटीच्या हद्दीत रहायचे नाही, असे त्याने मनोमन ठरविले व त्याने 'सिओरा' या गावी आश्रय घेतला.०४ व या घटनेपासून तंट्याने ब्रिटीशसत्तेच्या विरोधात क्रांतीकार्याची मूर्हूर्तमेढ रोवली. तंट्याने आपल्या उद्दीष्टपूर्तिच्या हेतूने प्रथमत: भिल्ल आदिवासीतरुणांना संघटीत करण्यास प्रारंभ केला. ब्रिटीश सत्तेच्या विरोधात त्यांना त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार व शोषणाची जाणिव करुन देऊन संघर्ष करण्यास तयार केले. तंट्याने लढाऊ संघटनेबरोबरच कूशल व कार्यक्षम असे 'गूप्तहेर' यंत्रणा सूद्धा उभारली होती. नर्मदा, तापी नंद्यामधील विध्यं, सातपुडा या भागातील भिल्ल, बंजारा कोरकू आणि शेतकरी यांच्यावर तंट्याचे अधिराज्य स्थापण झाले. त्याने आपल्या क्रांतीकार्याने ब्रिटीशांमध्ये एक प्रकारचीदहशत निर्माण केली होती. तंट्या हा साधारण क्रांतीकारक नाही या गोष्टीची जाणिव होताच तंट्याला पकडण्यासाठी खास डिटेक्टिव्ह विभागाच्या 'इब्राहिम बेग' नावाच्या इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आली.०५ परंतू तरीसूद्धा तंट्याला पकडण्यात ब्रिटीश सरकारला यश आले नाही. त्याला पकडण्यासाठी ब्रिटीशांनी भिल्लांची 'तंट्यापोलिस' नावाचे स्वतंत्र्य दल स्थापण केले होते. परंतू ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. तंट्याच्या क्रांतीच्या क्रांतीकार्याचा प्रभाव मध्यप्रदेशातील खरगोन, खंडवा, बैतूल, हौशंगाबाद, राजस्थानातील बॉसवाडा, भिलवाडा, डुगंरपूर आणि महाराष्ट्रातील खानदेश, नागपूर व अमरावती इ. भागावर होता.०६ सततच्या दगदगीमुळे तंट्या शरीराने थकला होता. खरगोणजवळील बाणेर येथे 'गणपत राजपूत' या व्यक्तीने कुटनितीने तंट्याला ब्रिटीश पोलीसांना पकडून दिले. तंट्याला पकडल्यावर त्याच्यावर खटला भरण्यात आला. त्यात त्याला प्रथम दरोडा घालणे आणि कत्तल करणे या गुन्हांखाली ७ ऑक्टोंबर १८८९ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.०७ व त्यानंतर त्याला फासावर लटकवण्यात आले. व अशापद्धतीने एका धगधगता क्रांतीच्या निखारा विझला.

### निष्कर्ष

परंपरागत अभिजनवादी इतिहासलेखनपरंपरेत भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात इतिहासलेखन करतांना तंट्या भिलसारख्या जननायक म्हणून गणल्या

गेलेल्या क्रांतीकारकाच्या क्रांतीकार्याला स्थान मिळाले नाही. परंतू एकोणिसाव्या शतकात 'Subalturn Studies' हा वंचिताचा इतिहासलेखन प्रवाह उदयास आला. व या वंचिताच्या लेखनप्रवाहाने आतापर्यंत दूर्लक्षित राहिलेल्या तंट्या भिलसारख्या ब्रिटीश सत्तेच्या विरोधात सशस्त्र क्रांतीचे बिगूल फुंकणाऱ्या क्रांतीकारकांच्या क्रांतीकार्याला आपल्या लेखणात महत्वपूर्ण स्थान दिले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात तंट्या भिलच्या क्रांतीकार्याला अनन्यसाधारण महत्व आहे.

### संदर्भसूची


१) संपादक भामरे, सर्जेराव - स्वातंत्र्य आंदोलनात खानदेशातील आदिवासी विराचे हौतात्म्य (स्मरणिका) ३१ जानेवारी २००९ पृ.क्र.३१.

२) गायकवाड, दिपक - 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा', सूगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००५, पृ.क्र.५३.

३) कित्ता - पृ.क्र.५३.

४) कित्ता - पृ.क्र.५३.

५) कित्ता - पृ.क्र.५४.

६) संपादक भामरे, सर्जेराव - उपरोक्त, पृ.क्र.३३.

७) गायकवाड, दिपक - उपरोक्त, पृ.क्र.५५.

रा. स. शि. प्र. मंडळ लि. चाळीसगाव संस्थेचे,

**नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण**
**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
चाळीसगाव, जि. जळगाव.



▪ फोन: २२२६०१, २२२८०३, २२९०६५ ▪ फॅक्स: ०२५८९-२२२६०१
▪ इमेल: rashtriyacollege@rediffmail.com ▪ वेबसाईट: www.rashtriyacollege.org

स्मरणिका

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र (मराठी विभाग)

# भारतीय स्तरावर मराठी भाषा आणि साहित्याच्या संशोधनाचे स्वरुप व अभ्यासाची दिशा

१८ व १९ ऑगस्ट २०१७

| प्रकाशक | संपादक |
| --- | --- |
| प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव | प्रा. डॉ. अनिता नाईक |

Prashant

ISBN 978-93-85021-01-5

» पुढच्या टप्प्यावरची ग्रामीण कादंबरी – गावठाण ........ ६७
– प्रा. डॉ. विजया पाटील

» १९८० नंतरची मराठी ग्रामीण कविता ........ ७०
– डॉ. दैवत सावंत

» नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितांतील शेतकरी आत्महत्याविषयक आशय आणि संदर्भ .... ७३
– प्रा. अनिल भिमराव भगत, प्रा. डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

» मराठी नाटकांचे सांस्कृतिक योगदान ........ ८०
– डॉ. रवींद्र शोभणे

» बोलीभाषांच्या क्षेत्रातील भाषाशास्त्रीय संशोधनाच्या संधी ........ ८४
– प्रा. डॉ. प्रकाश भामरे

» ग्रामीण, आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचा अभ्यास ........ ८८
– डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे

» आदिवासी काव्यातील समाजजीवन ........ ९३
– प्रा. डॉ. डी. ए. पाटील

» दलित साहित्याच्या स्थितीगतीचा आढावा ........ ९७
– प्रा. गौतम बाबुलाल थोरात

» ग्रामीण साहित्य आणि जागतिकीकरण ........ १०१
– सायली लाखे-पिदळी

» आदिवासी साहित्याचा अभ्यास ........ १०४
– प्रा. वळवी कविता सिपु

» मराठी दलित साहित्यातील वैचारिक लेखन ........ १०८
– प्रा. ममता काशिनाथ भारुडे

» दया पवार आणि केशव मेश्राम यांच्या कवितेची भाषा आणि काव्यदृष्टी ........ ११२
– डॉ. अतुल मधुकरराव देशमुख

» दलित साहित्य आणि समाज परिवर्तन ........ ११८
– प्रा. डॉ. छाया दत्तात्रय निकम

» महिला आणि प्रसारमाध्यमे ........ १२३
– सौ. अनिता गोपाल नाईक

# बोलीभाषांच्या क्षेत्रातील भाषाशास्त्रीय संशोधनाच्या संधी

प्रा. डॉ. प्रकाश भामरे
जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

'आधुनिक भाषाविज्ञान' या अभ्यासशाखेने भाषेच्या अभ्यासाचा परंपरागत दृष्टिकोन पूर्णतः बदलून टाकला. कोणत्याही प्रदेशातील, कोणत्याही जाती-जमातीच्या भाषेचा अभ्यास किंवा संशोधन भाषावैज्ञानिक पद्धतीने होऊ शकते; ही नवी दृष्टी या अभ्यासशाखेने आपल्याला दिली. लोकांनी काय बोलावे,कसे बोलावे हे त्यांना सांगण्याऐवजी लोक काय बोलतात; कसे बोलतात याचा अभ्यास होणे अधिक महत्त्वाचे आहे. या भूमिकेतून प्रत्येक बोलीभाषेकडे भाषेच्या संशोधकाने पाहणे गरजेचे आहे. यासंदर्भात सुप्रसिद्ध भाषावैज्ञानिक डॉ.ना.गो.कालेलकर म्हणतात, 'लोकांना भाषा शिकविण्याचे दिवस आता संपले आहेत; लोकांची भाषा शिकण्याचे दिवस आले आहेत.'

भाषाविज्ञान या अभ्यासशाखेच्या आज अनेक शाखोपशाखा आढळतात. त्यात ऐतिहासिक भाषाविज्ञान, वर्णनात्मक किंवा संरचनावादी भाषाविज्ञान, तुलनात्मक भाषाविज्ञान, समाजभाषाविज्ञान, मनोविभाषाविज्ञान, मानववंश भाषाविज्ञान, उपयोजित भाषाविज्ञान या विविध अभ्यासशाखांमध्ये बरेचसे संशोधन कार्य झालेले आहे. त्यात सोस्यूर, ब्लूमफील्ड, चॉम्स्की, सपीर, वोर्फ, मॅलिनोव्हस्की, फिशमन, लबव इ. भाषावैज्ञानिकांनी मौलिक कार्य केलेले आढळते. या सर्वांनी भाषेकडे पाहण्याची एक नवी लोकशाहीवादी दृष्टी दिली. त्यातूनच विविध बोलीभाषांच्या संशोधनाला चालना मिळाली. या पार्श्वभूमीवर भारतात पर्यायाने महाराष्ट्रात बोलीभाषांच्या क्षेत्रातील भाषाशास्त्रीय संशोधनाला पुष्कळ वाव किंवा संधी उपलब्ध आहेत.

प्रत्येक प्रदेशाची, प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी बोलीभाषा आढळते. त्या बोलीभाषांचा वर्णनात्मक, ऐतिहासिक, तुलनात्मक व समाजभाषावैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करता येईल. त्यांची व्याकरणे, शब्दकोश तयार करता येतील. विविधत्व किंवा विविधता हे बोलीभाषांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बोलीभाषांमध्ये प्रदेश, जात, व्यवसाय यानुसार विविधता आढळते. ही विविधता संशोधनातून अधोरेखित करणे आपले सामाजिक कर्तव्यच ठरते

बोलीभाषांविषयी एक नवी जाणीव विसाव्या शतकापासूनच निर्माण झालेली आढळते. बोलीभाषा हा माणसाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे; नव्हे सामाजिक-सांस्कृतिक दस्तऐवज आहे. त्यामुळे प्रत्येक समाजामध्ये त्यांच्या बोलीभाषेविषयी काही कल्पना, संकेत, अस्मिता, जाणिवा रूढ असणे अगदी स्वाभाविक आहे. तरीही जनसामान्यांच्या मनात बोलीभाषांविषयी बरेच गैरसमज अस्तित्वात आहेत. त्यातून बोलीभाषांच्या संशोधनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे.

संस्कृत ही देववाणी आहे; तिचे स्वरूप इतर भाषांपेक्षा विशुद्ध आहे. इतर भाषा अपभ्रष्ट आहेत; अप्रतिष्ठित आहेत, अशा प्रकारच्या समजुती आपल्याकडे जुन्या काळापासून चालत आलेल्या आहेत. या प्रकारच्या समजुतींना आधुनिक भाषाविज्ञानाने छेद दिला; व प्रत्येक बोलीभाषेकडे लोकशाही दृष्टीने पाहायला शिकविले. कोणत्याही भाषेचा किंवा बोलीभाषेचा अभ्यास करताना श्रेष्ठ-कनिष्ठ, शुद्ध-अशुद्ध, प्रतिष्ठित-अप्रतिष्ठित या कल्पना दूर ठेवाव्यात; ही दृष्टी आधुनिक भाषाविज्ञानाने दिली. एखादी भाषा वापरणारा सामाजिक गट जेवढा प्रबळ व प्रतिष्ठित तेवढी त्या गटाची भाषा श्रेष्ठ, शुद्ध वगैरे मानली जाते. सामाजिक-राजकीय-आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटांची भाषा मागासलेली, गावंढळ,

अपभ्रष्ट वगैरे मानली जाते. ही भूमिका आधुनिक भाषाविज्ञानाशी पूर्णत: विसंगत आहे. अश्लील भाषेला ग्राम्यङ भाषा असे म्हटले जाते. वस्तुत: 'ग्राम्य' हा शब्द 'ग्राम' या शब्दापासून आलेला आहे. म्हणजे ग्रामीण भागातील लोकांची भाषा अश्लील, अशुद्ध वगैरे असते; असे तथाकथित सुसंस्कृत लोकांना सूचवायचे असते. ही भूमिका आधुनिक भाषावैज्ञानिकांना मान्य नाही. भाषा शुद्ध-अशुद्ध वगैरे नसते; ती लहान-मोठी असू शकते. तेव्हा सर्व प्रकारचे पूर्वग्रह दूर सारून प्रत्येक बोलीभाषेचे संशोधन झाले पाहिजे. ही भूमिका भाषिक व सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने उपकारक ठरेल.

भाषेचा अभ्यास म्हणजे तिच्या लिखित रूपाचा अभ्यास ही समजूत अलिकडच्या काळापर्यंत रूढ होती. विकसित भाषांना बोलीरूप आणिलिखितरूप अशी दोन्ही रूपे असतात. हे जरी खरे असले तरी, सर्वच भाषांना लिपी असते; असे मात्र नाही. जगातील विविध भाषांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले आहे की, बऱ्याचशा भाषांना लिपीच नाही. म्हणजे त्या भाषांमधील उच्चार अनुसरण्यासाठी इतर भाषांच्या लिपी तोकड्या ठरतात. अशा भाषा संदेशनाचे किंवा संज्ञापनाचे कार्य मात्र यशस्वीपणे करताना आढळतात. आपल्याकडच्या निरक्षर-अशिक्षित माणसाला लिहिता-वाचता आले नाही, तरी तो सामाजिक विनिमयासाठी बोलीभाषेचा वापर करतच असतो. याचा अर्थच असा आहे की, बोलणे हेच भाषेचे मुख्य रूप आहे. लिहिणे हे भाषेचे दुय्यम रूप आहे. लिखित रूपाच्या पलिकडे भाषेचे कितीतरी वेगवेगळे उपयोग असतात. भाषाविज्ञानात या सर्वांचा अभ्यास अभिप्रेत असतो. म्हणूनच आधुनिक भाषाविज्ञान भाषेच्या बोली रूपांचा म्हणजेच औच्चारिक रूपांचा अभ्यास करण्यावर भर देते.

सामान्यत: असे मानले जाते की, ज्या भाषारूपांना लेखन परंपरा नाही; व जे भाषाभेद केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात, अशा भाषाभेदांना बोलीभाषा म्हटले जाते. बोलींच्या अभ्यासाचे शास्त्र ज्या वेळी उदयास आले; त्या वेळी भाषावैज्ञानिकांनी भूगोलशास्त्रातील अनेक संज्ञांचा उपयोग आपली मते मांडण्यासाठी केला; व बोलींच्या प्रादेशिक भेदांसंबंधीचा अभ्यास 'बोलीभूगोल' या नावाने ओळखला जाऊ लागला.

बोलीभाषांचा जसा प्रादेशिक किंवा भौगोलिक दृष्टीने अभ्यास होतो; तसा सामाजिक दृष्टीनेही अभ्यास-संशोधन होणे गरजेचे आहे. 'बारा कोसांवर भाषा बदलते' हा वाक्प्रयोग बोलीभाषेतील प्रादेशिकता सूचित करतो; तर 'जात तशी बात; दिवा तशी वात' ही म्हण सामाजिक भाषाभेदांचे सूचन करते. हिंदू समाजाचाच विचार केला तर, प्रत्येक ठिकाणी 'जात' व 'व्यवसाय साम्य' यावर आधारलेले अनेक वर्ग आढळतात. समान रूढी, चाली-रीती त्याचप्रमाणे इतर अनेक बंधनांनी एकत्र सहजीवन जगावे लागत असल्यामुळे एका जातीतील व्यक्तींना जी वैशिष्ट्ये प्राप्त होतात; त्यातली काही भाषिक स्वरूपाची असतात.

उपरोक्त संदर्भात डॉ.ना.गो. कालेलकर म्हणतात, 'जातिबाह्य प्रवृत्तींचा निषेध, प्रसंगी त्याविरूद्ध होणारे कडक इलाज आणि जातीच्या पंचांकडून होणारे नियमन, यामुळे जातिसंस्था संघटित आणि चिवट झाली. याचा परिणाम म्हणून इतर अनेक वैशिष्ट्यांप्रमाणे अंतर्गत विनिमयासाठी काही बाबतीत वापरला जाणारा 'शब्दसमूह' हे प्रत्येक जातीचे काही प्रमाणात वैशिष्ट्य ठरले. खानदेशातील विविध जाती-जमातींत वापरल्या जाणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण व वैचित्र्यपूर्ण शब्दावलीचा अभ्यास या संदर्भात करता येईल. बोलीभाषा अहिराणी जरी असली तरी; प्रत्येक जात आपले सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण आजही जपून आहे. या वेगळेपणाला अधोरेखित करणारे शब्द, वाक्प्रचार, म्हणी त्या-त्या जातीची जीवनपद्धती ठळकपणे लक्षात आणून देतात. या सर्व सामाजिक-भाषिकभेदांचा अभ्यास करणे एक मोठी संधी आहे.

आज जातिनिष्ठ धंदा किंवा धंदानिष्ठ जात पूर्वीइतक्या चिवट स्वरूपात नसेल; पण तरीही एकच धंदा करणाऱ्या व्यक्तींना कार्यपरत्वे एकत्र येऊन विनिमय करण्याची आवश्यकता कायमच आहे. भाषेचा हा विशिष्ट उपयोग त्या-त्या वर्गाच्या किंवा जातीच्या गरजेतून निर्माण झालेला आहे. या विविध बोलीरूपांचा भाषावैज्ञानिक व विशेषत: समाजभाषावैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे आहे.

प्रत्येक माणूस बोलीभाषेच्या टप्प्यातून पुढे येत-येत अनेक भाषा आत्मसात करतो; परंतु त्याच्या मायबोलीची जागा, तिचे त्याच्या जीवनातील महत्त्व दुसरी कोणतीही बोलीभाषा हिरावून घेऊ शकत नाही. यासंदर्भात सुप्रसिद्ध भाषावैज्ञानिक नोम चॉम्स्की याची भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे. तो म्हणतो, च्स्वन,वाक्ये व अर्थ या तीनही पातळ्यांवर भाषिक सामान्ये आढळतात. त्यातूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषा-भाषांमधील भेद काही मुलभूत तत्त्वांनी सीमित झालेली आढळतात; व ही तत्त्वे संरचनात्मक वा आकारिक स्वरूपाची असतात. भाषा-भाषांमध्ये ही जी आकारिक सामान्ये आढळतात, त्यांचे स्पष्टीकरण ऐतिहासिक वा भौगोलिक पुराव्यांच्या साहाय्याने देता येत नाही. वाक्यरचनांचे काही प्रकार अनेक भाषांमध्ये सारखाच आकार घेताना आढळतात. किंबहुना या रचनांचेकाही मुलभूत साचे असलेले आढळतात. व त्या साच्यांपैकी काही साच्यांचा वापर प्रत्येक भाषा करीत असते.छमायबोलीतील या अशा साच्यांचा वापर पुढे अनेक भाषा आत्मसात करण्यासाठी होतो. म्हणून मायबोलीचे स्थान आपल्या भाषाशिक्षणात महत्त्वाचे ठरते. असे असताना तथाकथित प्रमाणभाषेचे ठेकेदार बोलीभाषांना अशुद्ध, अप्रतिष्ठित ठरवितात, हे कितपत समर्थनीय आहे?

डॉ.ना.गो.कालेलकर बोलीभाषेविषयी म्हणतात, 'बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य असते. काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्काराचा प्रश्न आहे.' भारतीय सामाजिक प्रश्नांत जातिभेद ही महत्त्वाची समस्या आहे. उच्चनीचत्वाच्या तत्त्वावर जातींचा क्रम ठरलेला असतो. या क्रमाला अनुसरून उच्चनीचत्वाचे हे तत्त्व जीवनाच्या सर्व क्षेत्रांत लागू करण्यात येते. आहार, पोशाख, विवाहपद्धती आणि भाषा यांतही उच्चनीचत्व मानण्यात येते. हा सामाजिक भ्रम दूर करून सर्व प्रदेशातील, सर्व जाती-जमातींच्या बोलीभाषांचा अभ्यास झाला पाहिजे.

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करून घेणे, वेगवेळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गांची ओळख करून घेणे; म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे. अमुक प्रदेशाचे, अमुक जातीचे, अमुक वर्गाचे लोक कसे वागतात, ते पोशाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यांचे स्वरूप कसे आहे, याबाबतीत ते कोणत्या रूढी-परंपरा पाळतात हा अभ्यास किंवा यावरचे संशोधन पुष्कळ अभ्यासक करतात. परंतु संस्कृतीच्या या सर्व अंगांचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते; त्या भाषेचा पर्यायाने त्यांच्या बोलीभाषेचा अभ्यास मात्र फार कमी अभ्यासक करताना आढळतात. ज्यांना आपण मागासलेले समजतो; त्या धंद्यातील माणसांच्या तोंडी असणारी घ्शब्दसंपत्तीङ यांचा आपण अभ्यास केला तर संशोधनाच्या क्षेत्रात फार मोठे योगदान ठरेल.

खानदेशात विशेषत: नंदुरबार जिल्ह्यात मराठी सोबतच विविध आदिवासी बोलीभाषा,अहिराणी भाषा,गुजर भाषा बोलली जाते. नंदुरबार जिल्हा हा सीमा प्रदेशातील जिल्हा असल्याकारणाने भाषिक संशोधनाच्या दृष्टीने आदर्श परिसर ठरतो. आदिवासी बोलीभाषांमध्ये देखील सातपुड्यातील नर्मदा काठच्या आदिवासींची बोलीभाषा वेगळी आहे. नवापूर परिसरातील आदिवासींची बोलीभाषा पुन्हा निराळी आहे. साक्री तालुक्यातील बागलाणच्या पट्ट्याला लागून असलेल्या कोकणी आदिवासींची भाषा वेगळी आहे. त्याशिवाय शिरपूर, शिंदखेडा, धुळे या परिसरात असलेल्या भिल्ल जमातीची बोलीभाषा वेगळीच आहे. याबरोबरच लहान-लहान जातींच्या जसे - भावसार, रंगारी, तांबोळी, लोहार, बेलदार, ठेलारी, वंजारी, बंजारा, वडार, कंजर, कैकाडी, वैदू, डोंबारी, मांग गारोडी, इ. जमातींच्या बोलीभाषा पुन्हा वेगळ्याच रूपात अवतरताना दिसतात. या सर्व भाषिक रूपांचा भाषावैज्ञानिक, समाजभाषावैज्ञानिक, तुलनात्मक अशा विविध पातळ्यांवर अभ्यास होणे गरजेचे आहे.

डॉ.सु.बा. कुलकर्णी या संदर्भात म्हणतात, च्महाराष्ट्रातील आदिवासींच्या बोलीभाषांची अवस्था अत्यंत शोचनीय आहे. एकाही आदिवासी जमातीच्या बोलीभाषेची प्रमाण अशी मराठी पुस्तिका उपलब्ध नाही सह्याद्रीतील महादेव

कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, वारली, ठाकूर, कोकणे, कातकरी, दुबळे, धोडी, सातपुड्यातील भिल्ल, गामित, कोरकू नहाल, धनका, पारधी, नाईकडा, राठवा, गोंडवनातील माडीया, राजगोंड, आंध, कोलाम, परधान, हळवा, कतार इ. आदिवासी जमातींच्या बोलीभाषांचे संशोधन होऊन त्यांची व्याकरणे लिहिली जाणे,शब्दकोश तयार करणे व लोकसाहित्याचा संग्रह होणे या अत्यंत निकडीच्या गोष्टी आहेत.छ हे संशोधन मराठी भाषेतून झाल्यास ते बहुसंख्य वाचकांपर्यंत पोहचून आदिवासींच्या संस्कृतींची ओळख त्यांना होणे शक्य आहे. शिवाय या दुर्लक्षित, उपेक्षित जीवनांची ओळख झाल्याने त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न होणे शक्य आहे.

वेगाने होणारे सामाजिक–आर्थिक परिवर्तन, वाढता शिक्षणप्रसार, शहरी जीवनाचे आत्यंतिक आकर्षण व बदलती सामाजिक–सांस्कृतिक मूल्ये यामुळे आदिवासी, भटके व दलित यांच्या जीवनात आज मोठ्या प्रमाणात उलथापालथ होताना दिसत आहे. त्यांची राहणी, विचारसरणी,आशा–आकांक्षा यांच्यात आमूलाग्र बदल होत आहेत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या बोलीभाषांवर होणे स्वाभाविक आहे. विशेषत: प्रगत सामाजिक गटांमध्ये अप्रगत सामाजिक गट विलीन होण्याची प्रक्रिया वेगाने घडत आहे. म्हणून या विविध बोलीभाषा नष्ट होण्याच्या आत त्यांचे संशोधन होणे अत्यंत आवश्यक आहे.

एका परीने बोलीभाषांचा अभ्यास हा भाषाविज्ञानाच्या विकासासाठीही हातभार लावीत असतो. भाषांच्या संरचनेतील साधर्म्ये व वैधर्म्ये यांची माहिती मिळवण्याचे ते एकमेव साधन आहे. या माहितीच्या आधारावर भाषेच्या सार्वत्रिक वैशिष्ट्यांचे ज्ञान होऊन भाषेसंबंधी तात्त्विक विचारांची प्रगती होते. या दृष्टीने च्बोलीभाषांच्या अभ्यासाचे क्षेत्र म्हणजे भाषाविज्ञानाची प्रयोगशाळाच होय.छ हे डॉ.सु.बा.कुलकर्णी यांचे विधान समर्पक आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक – संपा.डॉ.स.ग.मालशे, डॉ.हे.वि.इनामदार, डॉ.अंजली सोमण

२. भाषा आणि संस्कृती – डॉ.ना.गो. कालेलकर

३. भाषा : इतिहास आणि भूगोल – डॉ.ना.गो.कालेलकर

४. आधुनिक भाषाविज्ञान – संपा.डॉ.कल्याण काळे, डॉ.अंजली सोमण

५. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्त आणि उपयोजन – डॉ.मिलिंद स. मालशे

# १९७५ नंतरचे मराठी नाटक :

## आशय आणि रचना



Prashant

डॉ. माणिक माधव बागले

# १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना

1975 Nantarche Marathi Natak : Aashay Aani Rachana

© सुरक्षित

**प्रकाशक व मुद्रक**

रंगराव पाटील । प्रशांत पब्लिकेशन्स: ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव ४२५००१.

**दूरध्वनी:** ०२५७-२२३५५२०,२२३२८०० **ईमेल:** prashantpublication.jal@gmail.com

**प्रथम आवृत्ती:** डिसेंबर २०१७ **आयएसबीएन:** ९७८-९३-८५०१९-००-५

**मुखपृष्ठ:** स्वप्नील फलटणकर **अक्षरजुळवणी:** प्रशांत पब्लिकेशन्स **मूल्य:** ₹ ४५०

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

www.prashantpublications.com

१७. १९७५ नंतरची अहिराणी रंगभूमी ........ १०२
– प्रा. डॉ. फूला मोतीराम बागुल
१८. १९७५ नंतरचे प्रमुख मराठी नाटककार व नाटक ........ १०८
– प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे
१९. १९७५ नंतरच्या आंबेडकरी नाटकांची आशयसूत्रे ........ ११३
– डॉ. प्रकाश अर्जुन भामरे
२०. प्रयोगशील नाटककार – रत्नाकर मतकरी ........ ११९
– प्रा. डॉ. किशोर मंगेश पाटील
२१. 'अंधातर' ते 'लालबाग परळ' (झाली मुंबई सोन्याची) ........ १२५
: वास्तवाचे माध्यमांतर
– प्रा. डॉ. योगिता आशुतोष पाटील
२२. १९७५ नंतरचे 'युगवाणी' या नियतकालिकातील ........ १३०
एकांकिका व नाट्यलेखन
– प्रा. स्वप्निल चंद्रशेखर देशमुख
२३. नभोनाट्य : व्यग्र जीवनास नाट्यात्म संजीवनी ........ १३६
– प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने
२४. १९७५ नंतरचे आंबेडकरी नाटक ........ १४१
– प्रा. डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे
२५. जयवंत दळवी यांची समस्याप्रधान नाटके : काही निरीक्षणे ........ १४८
– प्रा. योगेश देविदास पाटील
२६. १९७५ नंतरचे मराठी आंबेडकरी नाटक ........ १५५
– प्रा. अरूण दामू मोरे
२७. १९७५ नंतरची आंबेडकरी नाटके ........ १५९
– मनिषा सदाशिव डोंगरे
२८. १९७५ नंतरच्या 'वाटा–पळवाटा' : आंबेडकरी नाटकाचे वेगळेपण ........ १६३
– मोनाली रिपोटे
२९. १९७५ नंतरच्या स्त्री संघर्षाची जाणीव असलेल्या नाटककार........ १६७
– ज्योती म्हापसेकर व मीना देशपांडे
– प्रा. प्रशांत काशिनाथ पाटील
३०. जयवंत दळवी यांची समस्याप्रधान नाटके........ १७१
– प्रा. प्रेमसिंग मानसिंग गिरासे
३१. 'वाटा–पळवाटा' : एक संघर्षप्रधान नाटक........ १७३
– प्रा. डॉ. दिनेश हिंमतराव पाटील
३२. मराठी नाटक आणि राजकारण (जयवंत दळवी यांचे 'सुर्यास्त' नाटक)........ १७७
– प्रा. डॉ. माणिक माधव बागले
३३. १९७५ नंतरचे मराठी नाट्यवाङ्मय : आकलन आणि विश्लेषण ........ १८२
– प्रा. डॉ. रमेश नामदेव माने

# १९७५ नंतरच्या आंबेडकरी नाटकांची आशयसूत्रे

**डॉ. प्रकाश अर्जुन भामरे**
मराठी विभाग प्रमुख, जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

महात्मा जोतिबा फुले यांचे 'तृतीय रत्न' हे पहिले सामाजिक नाटक मानले जाते. १९५५-५६ च्या सुमारास म्हणजे महात्मा फुल्यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकानंतर जवळ-जवळ शंभर वर्षांनी डॉ.म.भि. चिटणीस यांनी 'युगयात्रा' हे नाटक लिहिले. दलितांच्या जीवनाची आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची कहाणी या नाटकाच्या माध्यमातून सांगितलेली आहे. म.भि. चिटणीस म्हणतात त्याप्रमाणे, ''दलित वर्ग हा भारताच एक पुराण मूक आणि अदृश्य पुरुष होय. हा वर्ग जागा झाला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिलढ्यामुळे आणि त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानामुळे!'' या अदृश्य आणि बहिष्कृत भारताला दृग्गोचर करण्याचे काम आंबेडकरी साहित्याने केले.

'युगयात्रा' हे नाटक आंबेडकरी रंगभूमीचा एका अर्थाने प्रारंभबिंदूच मानता येईल. या नाटकातून म.भि. चिटणीसांनी रामायण काळापासून १९४७ पर्यंत देशातील शूद्रातिशूद्रांच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे चित्रण केले आहे. शंबूकवध, करुणाकर भिक्खू, मनूची धर्मसभा, चोखाबा, चवदार तळ्याचा सत्याग्रह अशा दृश्यांमधून ही मानवतेवरील अत्याचारांची कहाणी साकार झाली आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'माणुसकीचे बंड' हे नाटक लिहिले. समाजसुधारणेसाठी संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या दलित बंडखोर नेत्याला प्रतिगामी आणि सनातनी शक्तींकडून होणारा विरोध; हे या नाटकाचे आशयसूत्र आहे. नामदेव व्हटकर यांच्या 'वाट चुकली' या नाटकातून सवर्णांकडून दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचे व माणुसकीपासून दलितांना वंचित ठेवणाऱ्या प्रवृत्तींचे दर्शन घडते. कारंडे गुरूजींनी 'नवी वाट' या नाटकातून धम्म स्वीकाराची नवी वाट दाखविली.

उपरोक्त नाट्यकृतींना आंबेडकरी रंगभूमीच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व आहे. आंबेडकरी जलसे हे नाटकाचे अविकसित रूपच होते. अण्णा भाऊ साठे साम्यवादी असले तरी; आंबेडकरी साहित्याचे अग्रेसर मानले जातात. तमाशा या पारंपरिक लोककलेला लोकनाट्याचे रूप देऊन अण्णा भाऊंनी लोकनाट्याला मराठी रंगभूमीशी जोडले. परंतु लोकनाट्य हे तमाशा, सत्यशोधकी जलसे आणि आंबेडकरी जलसे यांचे परिपक्व आणि विकसित रूप आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या

तत्त्वविचारांचा आणि कार्याचा प्रचार या जलशांतून होत असे. डॉ. आंबेडकरांच्या विचार–तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने समाजपरिवर्तनाची दिशा दाखविणाऱ्या आंबेडकरी नाट्यलेखनाची पार्श्वभूमी म्हणून आंबेडकरी जलसे हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

आंबेडकरी नाटके किंवा एकांकिका प्रामुख्याने दलितांच्या जीवनातील समस्यांवर आधारलेली आहेत. त्यामुळे ती समस्याप्रधान म्हणता येतील. अशी नाटके समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेतून निर्माण होतात. आंबेडकरी नाट्यलेखन दलितांच्या सामाजिक दु:खातून जन्माला आलेले आहे. नव्याने जाग्या झालेल्या दलितांचा लढा हा समाजातील मोठ्या लढ्याचा एक भाग आहे. हा लढा सामाजिक गुलामगिरी, शोषण, मानव्याची विटंबना नाहीशी करण्यासाठी सुरू झालेला लढा आहे. 'दलितत्व' नाकारून हा लढा स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या घटनादत्त मूल्यांची प्रस्थापना जोपर्यंत प्रामाणिकपणे भारतीय समाजात होत नाही तोपर्यंत चालूच राहणार आहे. या सामाजिक प्रबोधनासाठी, परिवर्तनासाठी रंगभूमीसारखे प्रभावी माध्यम दुसरे नाही; असे आंबेडकरी नाटककारांना वाटते. रंगभूमी ही दलितांच्या 'वेदने'ला आविष्कृत करू शकेल असा या नाटककारांना विश्वास वाटतो.

अमेरिकन निग्रो लेखकांनी वर्षानुवर्षांच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडल्या; आणि स्वत:ची अशी समर्थ रंगभूमी उभी केली. निग्रोंच्या मनात स्वातंत्र्याची मशाल पेटवावी हे 'ब्लॅक थिएटर'चे उद्दिष्ट्य होते. गोऱ्या लोकांनी निर्दयपणे केलेल्या अत्याचारांविरूद्ध, शोषणाविरूद्ध 'ब्लॅक थिएटर'ला उभे राहावेच लागले. त्याप्रमाणे प्रस्थापित मराठी रंगभूमीला आव्हान देण्यासाठी आंबेडकरी रंगभूमी उभी राहिलेली दिसते.

आंबेडकरी नाट्यलेखन दलितांच्या सामाजिक दु:खातून झालेले आहे. म्हणून या नाटकांना सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ आहेत. या संदर्भातून आंबेडकरी नाटकांचे आशयप्रदेश भारलेले आहेत. १९७५ नंतरच्या काळातील भि.शि. शिंदे हे एक प्रभावी आंबेडकरी नाटककार आहेत. त्यांचे 'काळोखाच्या गर्भात' हे नाटक एक मर्मस्पर्शी विचारनाट्य साकार करते. या नाटकाला मराठवाड्यातील दंगलीची पार्श्वभूमी आहे. ते या नाटकाच्या प्रस्तावनेत लिहितात, ''स्वातंत्र्याच्या बत्तीस वर्षात राज्यघटनेच्या व शिक्षणाच्या साहाय्याने मनुप्रणीत जातीयनिष्ठ समाजाचे रूपांतर धर्मनिरपेक्ष नव्या समाजात होईल. ही स्वप्ने उराशी बांधून जगणाऱ्याला मराठवाड्याच्या जातीय दंगलीने जबरदस्त तडाखा दिला. मराठवाड्यातील जातीय दंगल पाहून मी कमालीचा अस्वस्थ झालो.'' या अस्वस्थतेतून त्यांनी हे नाटक

लिहिले. या नाटकात सूत्रधार म्हणतो, ''तुमच्या आंधळ्या न्यायसंस्थेने सिद्रामला न्याय दिला नाही; म्हणून त्याने आपल्या हातात कुऱ्हाड घेतली आणि आपल्या बापाच्या मारेकऱ्यांना स्वत:च शिक्षा केली.'' सूडाने सूड विझेल काय? म्हणून लेखक या नाटकात सांगतो, ''या सर्व लोकांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगायचे आहे. त्यांना तसे जगू देणार नसाल; तर प्रत्येक घरात सिद्राम निर्माण होतील. या काळोखातून बाहेर पडण्यासाठी ते धडपडत आहेत. त्यांना बाहेर येऊ द्या. त्यांच्या हातात विज्ञान द्या, शास्त्र द्या, शस्त्र देऊ नका. तरच या काळोखाच्या गर्भातून दिव्य प्रकाश बाहेर पडू शकेल.'' त्यांनी 'भूमीपूत्र' या एकांकिकेतून भूमिहीन शेतमजूरांच्या समस्या मांडल्या. 'भिक्षुणी वासवदत्ता'मधून 'मरणे श्रेष्ठ नाही; तर दु:खावर मात करून जगणे श्रेष्ठ आहे' हे आशयसूत्र व्यक्त होते. स्वत:पेक्षा इतरांसाठी जगण्याची प्रक्रिया ही जीवनाला खरा आशय देते; हे मौलिक चिंतन या नाटकातून मांडले गेले आहे.

प्रेमानंद गज्वी यांची 'घोटभर पाणी' ही एकांकिका १९७७ मध्ये लिहिली आहे. या एकांकिकेने त्यांना नुसतेच यश दिले नाही; तर नाट्यलेखनाची दिशाही दिली. प्रेमानंद गज्वींनी अनेक नाटके लिहिली. 'तनमाजोरी', 'देवनवरी', 'जय जय रघुवीर समर्थ', 'किरवंत' इत्यादी. 'तनमाजोरी'मध्ये वेठबिगारांवरील अन्याय-अत्याचारांचे हृदयस्पर्शी चित्रण येते. 'देवनवरी'मध्ये देवदासींची समस्या मांडलेली आहे. धर्मप्रथांच्या नावाने गरीब मुलींना देवदासी करून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या यंत्रणेची अमानुषता हे नाटक मांडते. 'जय जय रघुवीर समर्थ'मधून क्रांती आणि प्रतिक्रांतीचे संबंधनाट्य मांडले जाते; तर 'किरवंत'मधून मर्तिकाचे क्रियाकर्म करणाऱ्या ब्राम्हणाचे चित्रण येते. ब्राम्हण ब्राम्हणांकडून कसा तुच्छतेने वागविला जातो; हे या नाटकाचे आशयसूत्र आहे.

'घोटभर पाणी' ही प्रेमानंद गज्वींची अतिशय गाजलेली एकांकिका आहे. अस्पृश्यतेचा अत्यंत मूलगामी विषय या एकांकिकेतून अधोरेखित होतो. या नतद्रष्ट देशात माणसासारख्या माणसाला प्यायला पाणी मिळत नाही. या नाटकातील 'पुरुष' म्हणतो, ''महाराचं मूल उचलून घेतलं तर क्रांती होते. घोटभर पाण्यासाठी माणसे मरोत; पण तेच गाढवाला पाजलं तर क्रांती होते. क्रांतीचे असले वांझ अर्थ आणि संदर्भ देशालाच रसातळाला घेऊन जातात.'' गज्वींना पाठ्यपुस्तकातील 'प्रतिज्ञा' अर्थहीन वाटते. 'मातीच मातीला मिळू देत नाही घोटभर पाणी' असे गंभीर तत्त्वज्ञान गज्वी या एकांकिकेच्या निमित्ताने मांडतात.

दत्ता भगत हे आंबेडकरी नाट्यसृष्टीतील महत्त्वाचे नाटककार मानले जातात. 'खेळिया', 'वाटा-पळवाटा', 'अश्मक' ही त्यांची महत्त्वाची नाटके आहेत.

'आवर्त' हा त्यांचा पारितोषिक विजेता एकांकिका संग्रह आहे. सोसायटी बदलली तरी माणसांची मनं बदलत नाहीत; ही प्रा. भगत यांची वेदना आहे. माणसांच्या वर्तनातील विसंवाद हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. एका 'आवर्ता'त गवसलेला समाज केव्हा मुक्त होईल? हे प्रश्न नाटककाराला पडलेले आहेत. अंधश्रद्धा, परंपरावाद, जातीय अहंकार यातून समाजाला मुक्ती केव्हा मिळेल हा प्रा. भगतांपुढील प्रश्न आहे. 'खेळिया'मध्ये शिक्षणातून मिळणाऱ्या सामर्थ्याचे चित्रण आहे. त्यातून नेतृत्वाचा विकावूपणा यावरही ते भाष्य करतात. आंबेडकरी समाजाच्या तीन पिढ्यांतील वैचारिक-मानसिक संघर्ष आणि स्थित्यंतरे याचे चित्रण 'वाटा-पळवाटा'मधून येते. माणसाची 'वाट' शोधण्याची आणि 'पळवाट' शोधण्याची प्रवृत्ती यांचा संघर्षही या नाटकातून ठळक होताना दिसतो. 'अश्मक'मधून न्यायाचे समर्थन व अन्यायाचे विरोधन या जाणिवा अधोरेखित होतात. स्वाभिमानपूर्ण जीवनाचे चित्रण यातून साकार झालेले आहे.

भि. शि. शिंदे, प्रेमानंद गज्वी आणि दत्ता भगत हे तीन नाटककार आंबेडकरी रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार मानले जातात. 'त्यांच्या नाट्यप्रतिभा अव्वल दर्जाच्या आहेत' असे मत थोर समीक्षक डॉ. यशवंत मनोहर त्यांच्यासंबंधी नोंदवतात. याशिवाय अनेक आंबेडकरी नाटककारांनी आंबेडकरी रंगभूमीचे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजही दलितांना भोगाव्या लागणाऱ्या यातना, त्यांच्यावर व्यवस्थेने लादलेल्या अंधश्रद्धा, सामाजिक जाच आणि अन्याय यांचे भेदक चित्रण कमलाकर डहाट यांच्या 'नरबळी' या नाटकात आहे. तर 'हत्याकांड' या नाटकात ग्रामीण भागातील धनदांडगे स्त्रियांवर आणि पुरुषांवरही कसे अत्याचार करतात; खून पाडतात याचे भीषण चित्रण केले आहे.

प्रकाश त्रिभुवन यांच्या 'थांबा रामराज्य येतेय' या नाटकात अस्पृश्यांच्या हजारो वर्षापासूनच्या शोषणाचे चित्रण येते. न्यायासाठी होणारा संघर्ष अहिंसक मार्गाने व्हावा; ही आंबेडकरवादी भूमिका या नाटकाचे आशयसूत्र आहे. संजय पवार यांचे 'कोण म्हणतं टक्का दिला' हे नाटक दलित-दलितेतरांच्या प्रश्नावर भाष्य करते. तर रामनाथ चव्हाण लिखित 'बामणवाडा' दलितांना आशावादाचे दर्शन घडविते. त्यांच्या 'साक्षीपूरम' या नाटकात दलितांना हिंदू धर्मात सोसावे लागणारे दुःख; आणि या दुःख मुक्तीसाठी इस्लाम धर्माकडे झेपावणारी त्यांची मनोवृत्ती, यांचे चित्रण आहे. लक्ष्मण माने यांचे 'प्रकाशपुत्र' हे नाटक सर्वांनाच प्रकाशपुत्र होण्यास प्रवृत्त करते. दलित-सवर्ण यांच्यातील संघर्षाबरोबरच ढोंगी आंबेडकरवादी व खरे आंबेडकरवादी कोण यांचेही चित्रण या नाटकातून येते. डॉ. रा.का. क्षीरसागर यांच्या 'प्रतिबिंब' या नाटकात दलितांमधील अनिष्ट प्रवृत्तींचे

आणि त्यामुळे झालेल्या अध:पाताचे ठळक चित्रण येते. बाजीराव रामटेके यांनी 'इथे माणसाला स्थान नाही' हे नाटक प्रकाशित केले; हिंदू धर्मात माणसाला स्थान नाही. माणूस म्हणून जगायचे असेल; तर जाती-जातींचा कलंक पुसून काढायचा असेल; तर धम्म स्वीकाराशिवाय दुसरा पर्याय नाही. हा या नाटकाचा आशय आहे.

प्रभाकर दुपारे यांनीही कसदार आंबेडकरी नाटके लिहिली. त्यांच्या 'झुंबर' या संग्रहामध्ये एक नाटक आणि दोन एकांकिका आहेत. तर 'साता समुद्रापलिकडे'मध्ये 'जयक्रांती', 'साता समुद्रापलिकडे' आणि 'अदृश्य नाटक' अशी तीन लघुनाटके आहेत. या तिन्ही लघुनाटकांचे आशयसूत्र बदल, परिवर्तन, क्रांती, मानवशाहीसाठी ईश्वरशाहीविरुद्ध बंड हेच आहे. 'कलिंगविजय' या नाटकात सम्राट अशोकाच्या धम्मस्वीकाराचा सामाजिक आशय व्यक्त झाला आहे. 'विदूषक' हे त्यांचे नाटक उपरोधिक शैलीने लिहिले गेलेले नाटक आहे. गोरगरिबांची वेगवेगळ्या प्रकारे समाजात कशी पिळवणूक होते. खोटारडे, दांभिक, चोर हे कसे सन्माननीय ठरतात; या संबंधीची अनेक प्रभावी चित्रे 'उत्सव' या नाटकाचा आशय आहे. या देशात पुरोहितवर्गच अन्याय करतो असे नाही; तर तो देशमुखांकडूनही होतो. ही लेखकाची जाणीव 'जयक्रांती'मध्ये व्यक्त झाली आहे. इ.मो. नारनवरे यांनी लिहिलेली 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' ही एकांकिका नावाप्रमाणेच विषय-आशयाशी अन्वर्थक आविष्काराने संबद्ध आहे. रुस्तुम अचलखांब यांचे 'कैफियत' हे नाटक वेगळ्या प्रकारचे आहे. दलित मनाचे प्रभावी चित्रण त्यात आले आहे; आणि उद्ध्वस्त केल्या गेलेल्या दलित कलेविषयी खंतही आहे. टेक्सास गायकवाड यांनी 'आम्ही देशाचे मारेकरी' या नाटकातून संस्कृतीचा बुरखा पांघरलेल्या हिंदुत्ववादी मनोवृत्तीचे वस्त्रहरण केले आहे.

याबरोबरच संजय पवार यांचे 'दोन अंकी नाटक', रामदास कांबळे यांचे 'सुंबरान मांडियलं', बलभीम तरकसे यांचे 'स्वातंत्र्य मिळालंय म्हणे', प्रा.दत्ता भगत यांची 'चक्रव्युह' ही एकांकिका, दया पवार यांची 'मुंबई नगरी', योगिराज वाघमारे यांची 'अगा जे घडलेचि नाही', श्रीकृष्ण राऊत यांची 'ब्लाइंड शो', हेमंत खोब्रागडे यांचे 'सूर्यास्त' हे नाटक प्रतिगामी प्रवृत्तींचा उपहास करते. सर्वच आंबेडकरी नाटके रंगभूमीकडे बदलाचे, परिवर्तनाचे महान साधन म्हणून पाहतात. आंबेडकरी नाटकांतील प्रक्षोभ किंवा विद्रोह हा सुसंस्कृत राष्ट्र घडविण्यासाठी आहे. समाज किंवा राष्ट्र बिघडविण्यासाठी नव्हे. एकूणच आंबेडकरी रंगभूमीवरून व्यक्त होणारी आशयसूत्रे 'जग बदल घालुनि घाव' या भूमिकेतून व्यक्त होतात.

निग्रो लेखक आपली वेदना व्यक्त करताना म्हणत असत की, गोऱ्यांना

